Application from retired Government Officers in cadre of Group A, or Group B (Gazetted) & Group B (Non Gazetted)

# जाहिरात

## महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

**राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय**

**७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.**

शासकीय सेवेतून गट अ (ग्रेड वेतन रु. ७,६००/- पेक्षा कमी)/ गट-ब (राजपत्रित) व गट-ब (अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने खालील विवक्षित कामांकरिता मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने घेण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) / गट-ब (राजपत्रित)<br><br>(पदसंख्या -१) | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रार अर्जांवर कार्यवाही करणे, मा. मुख्य आयुक्त यांच्या बैठका आयोजित करण्यास सहाय्य करणे, आयोजित करण्यात आलेल्या बैठकांचे इतिवृत्त तयार करणे, मंजूर इतिवृत्त निर्गमित करून कार्यपूर्तीसाठी संबंधितांकडे पाठपुरावा करणे, मा.मुख्य आयुक्त यांच्या कार्यालयीन तपासणी व दौऱ्यांने नियोजन करणे. | गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) / गट-ब (राजपत्रित) पदावरील. कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव<br>अर्हता:- पदवीधर.<br>संगणकाचे ज्ञान (MSCIT) आवश्यक, तसेच प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक.<br>वयोमर्यादा :- ५८ ते ६४ वर्षे |
| २ | गट-ब (अराजपत्रित)<br><br>(पदसंख्या -१) | आयोगांतर्गत लेखा विषयक कामकाज, आयोगाचे अर्थ संकल्प प्रस्ताव तयार करणे, अर्थ संकल्पीय अनुदान विषयक बाबी हाताळणे, कार्यालयीन उपयोगासाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणे, राज्यातील सहा राज्य सेवा हक्क आयुक्त यांचेशी समन्वय साधून निधीची मागणी नोंदविणे, लेखा विषयक प्राप्त शासन संदर्भ हाताळणे तसेच लेखा विषयक अहवाल सादर करणे, इत्यादी कामकाजात आयोगाच्या संबंधित आहरण व संवितरण अधिकारी तसेच विभाग प्रमुख यांना सहाय्य करणे. | गट-ब (अराजपत्रित) पदावरील. कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव<br>अर्हता:- पदवीधर.<br>संगणकाचे ज्ञान (MSCIT) आवश्यक, तसेच<br>वित्तीय कामाचा अनुभव<br>वयोमर्यादा :- ५८ ते ६४ वर्षे |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीबीई -१५२५ / प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३),दि.१० जून,२०२५ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील.

२. करारपद्धतीने आयोगामध्ये सेवा देणाऱ्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही.

३. करार तत्वावरील सेवा देणाऱ्या व्यक्तीस अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.

४. कराराच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपद्धतीने सेवा देणाऱ्या व्यक्तीची असेल.

५. करारपद्धतीने सेवा देणाऱ्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. ३१.०८.२०२६ पर्यंत सादर करावेत.**

**संपर्क** :- राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, ७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२

**दूरध्वनी :- ०२२ -२२८३२३४६**
**ई-मेल** :- ccrts@maharashtra.gov.in
**दिनांक** :- २१.०८.२०२६

मा.मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने

**(वैशाली राज चव्हाण {निर्धार})**
**सचिव**
**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग,मुंबई**